स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

सामाजिक शास्त्रातील पीएच.डी. (इतिहास) या पदवीच्या शोधप्रबंधाचा

आराखडा

शोध प्रबंधाचा विषय

बुध्द शिल्पकलेवरील कवि अष्वघोषांच्या साहित्याचा प्रभाव

(Influence of the Literature of The Poet Ashwaghosh on The Buddha Sculpture)

* संशोधक *

खराटे गजानन यशवंतराव

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मार्गदर्शक

डॉ. भालेराव जी. पी. (M.A.B.Ed, Ph.D.)

प्रपाठक, इतिहास विभाग तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव

बुध्द शिल्पकलेवरील कवि अष्वघोषांच्या साहित्याचा प्रभाव

प्रकरण - पहिले

प्रस्तावना :

प्रसिध्द विदवान दार्शनिक बौध्द विचारवंत व बुध्दांचे जीवनचरित्र सर्वप्रथम लिखाण करणारे महाकवी म्हणून ख्याती आहे. ते कुशाण सम्राट कानिष्काचे समकालीन मानले जातात. त्यांचा जन्म ई.स. दुसऱ्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. सम्राट कनिष्काने बोलावलेल्या चौथ्या कश्मीर येथील धम्मसंगीतेचे अध्यक्ष होते. कवी अष्वघोश्यानी अनेक महत्वपूर्ण ग्रंथाची रचना केली. त्यातील प्रमुख रचना पुढील प्रमाणे

1) **बुध्दचरीतम**

2) **सौन्दरानंद**

3) **सारीपुत्रप्रकरनम**

'बुध्दचरीतम' हे काव्य संस्कृत मध्ये 14 सर्गात (भागात) आहे. परंतु ते चीनी व तिबेटी परंपरेनुसार 28 भागात विभात आहे. सध्या याचे केवळ 14 भागच उपलब्ध आहेत. या ग्रंथाचा अनुवाद श्री. सुर्यानारायण चौधरी यांनी केला आहे. या महाकाव्यात बुध्दाच्या गर्भधारनेपासून ते बुध्दत्व प्राप्ती पर्यंतच्या घटनांचे वर्णन केलेले आहे. त्यांचे दुसरे अत्यंत महत्वाचे महाकाव्य म्हणजे 'सौन्दरानंद' होय. काव्याच्या दृष्टीकोनातून ते बुध्दचरित्रा पेक्षाही अत्यंत विलोभनीय, सुंदर मानले जाते. यामध्ये बुध्दांचा सावत्र भाऊ नंद व त्याची रुपवान पत्नी सुंदरेचे वर्णन केले आहे. नंद आपल्या पत्नीच्या प्रेमात व ऐहिक सुखात कसा अखंड बुडतो. तथागत बुध्द नगरीमध्ये आले असता नंद साधी त्यांची विचारपूसही करत नाही. शेवटी सुख संसाराची क्षणभंगुरता लक्षात येऊन तो तथागताला शरण जातो भिक्षु संघात सामील होतो याचे सुंदर वर्णन केलेले आहे.

कवि अष्वघोषांनी लिहिलेल्या साहित्यावर आधारितच पुढे जि शिल्पकला निर्माण झाली त्यावर या साहित्याचा प्रभाव दिसून येतो. अजंठा, वेरुळ, कार्ले, भाजे येथील अनेक शिल्पांवर हा प्रभाव बघता येतो. या लेण्यात जी शिल्पे

कोरलेली आहेत जे प्रसंग चितारलेले आहेत तसे जसेच्या तसे वर्णन अष्वघोषांच्या साहित्यात आढळते. त्याच साहित्याचा अभ्यास करुन त्याचा प्रभाव अभ्यासण्यासाठी हा विषय निवडलेला आहे.

संशोधनाची उदिष्टे :-

1) कवि अश्वघोषांच्या' सौन्दरानंद, बुध्दचरित, सारीपुत्रप्रकरनम' या साहित्याचा बुध्दशिल्पकलेवरील प्रभाव अभ्यासणे.

2) बुध्द शिल्पकलेत वापरलेल्या प्रतीकांचा अभ्यास करणे.

3) बुध्दांच्या जीवनाविषयी निगडीत शिल्पकलेचा अभ्यास करणे.

4) शिल्पकलेतील बदलांचा अभ्यास करणे.

5) भारतीय शिल्पकलेचा इतिहास अभ्यासणे.

संशोधनाची गृहीतके :

1) बुध्द शिल्पांची निर्मिती ई.स. च्या 1 ल्या शतकापासून सुरु झाली.

2) अनेक लेण्या, स्तूप, विहारे यावरील शिल्पावर अष्वघोषांच्या साहित्याचा प्रभाव दिसून येतो.

3) अनेक राजे महाराजांनी बुध्द शिल्पकलेला राजाश्रय दिला.

4) व्यापारी, धनिक वर्ग यांनी सुध्दा शिल्पकलेला प्रोत्साहन दिले.

5) व्यापार व पर्यटनामुळे बुध्द शिल्पकला जागतिक स्तरावर पोहोचली.

6) कवि अष्वघोषांच्या साहित्यात वर्णन केल्याप्रमाणे अनेक बुध्द शिल्पे निर्माण झाली आहेत.

साधने :-

1) कवि अष्वघोष लिखित: 1) सौन्दरानंद

2) बुध्दचरीतम

3) सारीपुत्रप्रकरनम

2) ' बुध्द आणि त्यांचा धम्म ' - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

3) वेरुळचे शिल्पवैभव - टिपरे राधिका, पुणे - 2006

4) भारतीय शिल्पवैभव - देशपांडे सु.र.

5) Gupte R.S. ' The Iconography of The Buddhist Sculpture (caves) of Ellora, Aurangabad- 1964

6) Rowland Benjamin- The Evolution of The Buddha Images, New York-1964

7) Bhattacharya Benoytosh - The Indian Buddhist Iconography calcutta - 1958

8) थेरगाथा - थेरीगाथा

9) सुत्तपिटक

10) अभिधम्मपिटक

11) मराठी विश्वकोश

12) बौध्द साहित्य - राहुल सांक्रत्यायन

13) बौध्द साहित्य - धर्मानंद कोसंबी

14) ' खोए हुए बुध्द की खोज ' - राजेंद्र प्रसाद

15) ' बुध्द धम्म का सार ' - प्रो.पी.एल.नरसू

संशोधनाची व्याप्ती :

1) महाकवी अष्वघोष सौन्दरानंद, बुध्दचरीतम या साहित्यावर आधारित.

2) प्रामुख्याने महाराष्ट्रातील लेणी, चैत्य, स्तूप यांचा अभ्यास.

3) बुध्द लेणी, स्तूप, चैत्य यावरील शिल्पकलेचा अभ्यास.

4) बुध्द जीवनासंबधी प्रमुख ठिकाणे उदा. गया, लुंबिनी, सांची, सारनाथ, अमरावती येथे क्षेत्र भेटी.

संशोधनाच्या मर्यादा :

1) फक्त बुध्द शिल्पकलेवरील अष्वघोशांच्या साहित्याचा प्रभाव अभ्यासणे.

2) भारतीय उपखंडात उत्खननात सापडलेल्या बुध्द शिल्पाकृतींचा अभ्यास.

3) वस्तुसंग्रहालयातील प्राचीन शिल्पाकृतींचा अभ्यास करणे.

प्रकरण - पहिले

अष्वघोशांचे चरित्र

संस्कृतमध्ये प्रथम बुध्द चरित्र लिहिणारे महाकवी त्यांच्या बद्दल सौन्दरानंद या महाकाव्यातून त्यांच्य आई चे नाव सुवर्नाक्षी होते हे दिसून येते. साकेत (अयोध्या) नगरी मध्ये ते वास्तव्यास होते. ते महाकवी, भदंत, आचार्य, महावादी अश्या अनेक नावाने ओळखले जायचे. जातीने ब्राम्हण असून सुध्दा ते बुध्द धर्माचे कट्टर समर्थक होते. वेद, रामायण, महाभारत, उपनिषदाचे ते प्रकांड पंडित होते. सम्राट कनिष्काचे राजकवी होते. सम्राट कनिष्काने कुंडलवन (कश्मीर) येथे भरलेल्या चौथ्या बुध्द संगितीचे उपाध्यक्ष (अध्यक्ष - वासुमित्र) होते.

प्रकरण - दुसरे

अष्वघोषांचे साहित्य

बहुमुखी प्रतिभेचे धनी, संस्कृत पंडित, धर्म, अर्थ, शास्त्र, यावर प्रभुत्व असलेले त्यांनी अनेक ग्रंथाची रचना केली. त्यातील प्रमुख रचना पुढील प्रमाणे - वज्रसुची, महायान श्राधोत्पादशास्त्र, सुत्रालंकार कल्पनामंडीतिका नामक धर्म व दर्शनशास्त्र यावर आधारित महत्वपूर्ण रचना आहेत.

या व्यतिरिक्त सौन्दरानंद हे रुपक महाकाव्य असून संस्कृत मधील बुध्दांचे पहिले चरित्र ' बुध्दचरीतम ' हि रचना त्यांचीच आहे.

प्रकरण - तिसरे

साहित्य समीक्षा

अष्वघोषांचे ' बुध्दचरित ' हे महाकाव्य म्हणजे त्यांच्या लेखन कार्याचा किर्तीस्तंभ मानल्या जातो. यात तथागतांच्या जन्मापासून ते निर्वाणापर्यंतचे अत्यंत रसपुर्ण वर्णन केले आहे. हे काव्य 14 भागात विभक्त आहे. मूलत: हा ग्रंथ चीनी व तिबेटी परंमपरेनुसार 28 भागात आहे. या ग्रंथाचा हिंदी अनुवाद श्री. सुर्यनारायण चौधरी यांनी केला आहे.

दुसरे महत्वपूर्ण महाकाव्य म्हणजे 'सौन्दरानंद' होय. काव्याच्या दृष्टीकोनातून ते 'बुध्दचरित' पेक्षाही अत्यंत विलोभनीय, सुंदर मानले जाते. यात बुध्दाचे सावत्र भाऊ नंद व त्याची पत्नी सुंदरेचे वर्णन केले आहे. नंद आपल्या पत्नीच्या प्रेमात अखंड बुडतो. बुध्द नगरात आले असता साधी विचारपूसही तो करत नाही. याचे वाईट वाटून तो बुध्दांना भेटायला जातो व तेथेच कशाप्रकारे भिक्षु संघात प्रवेश करतो याचे अत्यंत भावपूर्ण वर्णन केलेले आहे.

कवी अष्वघोष यांच्या बुध्दचरितं चरित्रामध्ये एकूण 28 सर्गापैकी तेरा सर्ग हे मुख्य आहेत. ते खालील प्रमाणे

1) भगवतप्रसूती

2) अंत:पुर विहार

3) संवेगोत्पत्ती

4) स्त्रीविघातनं

5) अभिनिष्क्रमण

6) छंदकनिवर्तनम

7) तपोवन प्रवेशम

8) अंत: पूरविलाप

9) कुमारान्वेषनम

10) श्रेनभिगनम

11) कामविग्रहंनम

12) अराड दर्शन

13) मार विजय

वरील सर्गांचे थोडक्यात वर्णन खालील प्रमाणे

1) भगवतप्रसूती :

या मध्ये राणी महामायेचे स्वप्न दर्शविलेले आहे. सुमेरु पर्वतावरुन एक पांढरा शुभ्र हत्ती महामायेच्या गर्भामध्ये प्रवेश करत असल्याचे यामध्ये वर्णन आलेले आहे. त्याचप्रमाणे बुध्दांचा जन्म झाल्यानंतर असित मुनींनी त्यांच्यासंबंधी वर्तविलेले भविष्य, देवतांनी केलेले बुध्दांच्या जन्माचे स्वागत या सर्वांचे अत्यंत मनोरम वर्णन केलेले आहे.

2) अंत:पुर विहार :

या दुसऱ्या या भागामध्ये भगवान बुध्दांच्या राजमहालातील बालपणीच्या, क्रीडा तरुणपणी यशोधरेशी झालेले लग्न, बाळ राहुल चा जन्म यासंबंधीचे वर्णन केलेले आहे.

3) संवेग उत्पत्ती :

या भागात बुध्दाच्या मनात वैराग्य उत्पन्न होण्याविषयी चर्चा केलेली आहे यासंबंधी राजा शुध्दधनाने घेतलेल्या काळजीचे वर्णन आहे राजपुत्रासाठी तीन ऋतू मधील तीन महाल बांधले व त्याच प्रमाणे सिध्दार्थ गौतमाच्या मनामध्ये संसारिक गोष्टीविषयी प्रेम निर्माण व्हावे, भावी संसारिक सुखात तो रममान व्हावा यासाठी प्रयत्न केल्याचे वर्णन आहे.

4) स्त्रीविघातन :

या सर्गामध्ये सिध्दार्थ राजकुमार नगर भ्रमणावर निघाल्याचे वर्णन केलेले आहे. त्यांच्या स्वागतासाठी सारी नगरी व अनेक नितांत सुंदर स्त्रिया उभ्या आहेत. त्या सिध्दार्थ गौतमाला वश करण्याचा प्रयत्न करत आहेत. काही स्त्रिया यासाठी उत्तेजित करणारे हावभाव करत आहेत व काही आपली वस्त्रे स्वत: उतरवत असल्याचे यामध्ये वर्णन आहे.

परंतु सिध्दार्थ एक क्षणही विचलीत होत नाही. शेवटी स्त्रिया आपल्या प्रेमलीलानी सुध्दा सिध्दार्थाला वश करु शकत नाही याचे वर्णन केलेले आहे.

5) **अभिनिष्क्रमण** :

पाचव्या भागामध्ये भगवान बुध्दांच्या ग्रहत्यागाचे वर्णन आहे आपले वडील राजा शुध्दोधन यांची आज्ञा घेऊन ते गृहत्याग करतात व ग्रहत्यागाचा सर्व कपिलवस्तु नगरी, सर्व प्रजा कशा प्रकारे दु:ख विलाप करते याचे वर्णन आहे.

6) **छंदकनिवर्तनम** :

या भागामध्ये सिध्दार्थ गौतमाचा प्रिय घोडा कंठक व मित्र छंदक यांना निरोप देण्याचे वर्णन आहे. यामध्ये बुध्दांचा मित्र सेवक छंदक बुध्दाचे मन वळविण्याचा कशाप्रकारे प्रयत्न करतात यासाठी ते वृध्द होत जाणारे राजा शुध्दोधन , राणी प्रजापती, पत्नी यशोधरा व पुत्र राहुल यांच्या बाबतीत काळजी विषयी विनंती करुन त्यांचे मन वळण्याचे प्रयत्न करत असल्याचे वर्णन आहे.

7) **तपोवनप्रवेशम** :

या भागामध्ये गृहत्याग केल्यानंतर सिध्दार्थ गौतम आश्रमातील अनेक ऋषी कडून विद्या ग्रहण करतात परंतु त्या सर्वाच्या विद्या मुळे त्यांच्या मनाचे समाधान होत नाही याचे वर्णन आलेले आहे.

8) **अंत:पुरविलाप** :

सिध्दार्थ गौतमाने गृहत्याग केल्यानंतर कपिलवस्तु नगरी वासियांचा विलाप , पत्नी यशोधरा, राजा शुध्दोधन या सर्वांवर कशा प्रकारे दु:खाचा डोंगर कोसळतो याचे दु:खमय वर्णन केलेले आहे.

9) **कुमारावेषणं** :

या भागामध्ये सर्व कपिलवस्तु नगरी राजा शुध्दोधन व राजदरबारातील सर्व मंत्री यांच्या विनंतीकरुन सिध्दार्थ गृहत्याग वरुन परत आणण्यासाठी , राजमंत्री व पुरोहित

वनांमध्ये जातात व सिध्दार्थाला आपल्या नगरीमध्ये परत येण्याविषयी कशाप्रकारे विनंती करतात याचे वर्णन केलेले आहे.

10) श्रेनभिगनम :

दहाव्या भागामध्ये सिध्दार्थ गौतम भिक्षाटना करिता जेव्हा मगधाधिपती राजा बिंबिसार यांच्या नगरांमध्ये प्रवेश करतात त्यांचा मगधवासींयावर पडलेला प्रभाव व त्यामुळे प्रत्यक्ष राजा बिंबिसार स्वत:हून बुध्दांना भेटायला गेले. त्यांना हे भिक्षू जीवन सोडण्यासाठी विनवणी करतात व त्यासाठी आपले अर्ध राज्य घेण्या विषयी सुध्दा बुध्दाला विनंती करता त्याचे वर्णन आलेले आहे.

11) कामविग्रहंनम :

या भागांमध्ये राजा बिंबिसार व भगवान बुध्द यांच्यामध्ये काम, तृष्णा, मोहमाया, मित्रता जन्म, मृत्यू या विषयी भगवान बुध्दांनी राजा बिंबिसार यांना केलेल्या उपदेशाचे वर्णन आहे व आपल्या गृहत्यागाचे प्रयोजन सांगितले आहे.

12) अराड दर्शन :

मगज नरेश राजा बिंबिसार यांच्या भेटीनंतर सिध्दार्थ गौतम हे ज्ञान मिळवण्यासाठी अराड ऋषींच्या आश्रमामध्ये जातात. तेथे त्यांच्याकडून विद्याग्रहण केल्यानंतरही त्यांचे समाधान होत नाही. तेव्हा ते उदकरामपुत यांच्या आश्रमात जाऊन त्यांच्याकडून ज्ञानग्रहण करतात परंतु आत्म्यासंबंधी त्यांचे तत्व न पटल्यामुळे ते आलारकालाम यांच्या आश्रमात जातात. त्यांचे आभार मानून तेथेही त्यांचे समाधान न झाल्यामुळे ते राज ऋषींच्या आश्रमात जातात. व जोपर्यंत आपल्याला ज्ञानप्राप्ती होत नाही तोपर्यंत आपण हे आसन सोडणार नाही असा त्यांचा दृढ संकल्प याचे वर्णन या भागामध्ये आहे.

13) मारविजय :

बुध्दत्व प्राप्त झाल्यानंतर भगवान बुध्दांच्या मनामध्ये अनेक विचार उत्पन्न झाले. आपणास प्राप्त झालेले ज्ञान इतरांना सांगावे की नाही यांविषयी त्यांच्या मनामध्ये व्दंव्द निर्माण झाला. शेवटी कशाप्रकारे त्यांनी मारावर विजय मिळवला याचे वर्णन आहे.

प्रकरण - चौथे

शिल्पकलेचा इतिहास

प्राचीन भारताच्या इतिहासात मूर्तीकला व शिल्पकला हे दोन कला संप्रदाय स्वतंत्ररित्या फारसे अस्तित्वात आढळत नाहीत. केवळ वास्तुशिल्पाला सौंदर्याची जोड म्हणून यांचा उपयोग केलेले दिसतो. भारताच्या दृष्टीकोनातून मुर्तीकलेचा प्रारंभ हडप्पा - सिंधू संस्कृतीमध्ये झालेला दिसतो. यात एका स्त्री-ची मातीची प्रतिमा मिळाली आहे. ती मात्रदेवतेची असल्याची अनेक इतिहासकार मानतात. पण पाषाणावर मूर्ती कोरण्याचा काळ हा त्यापेक्षाही पुढचा असावा याचे प्राथमिक पुरावे गांधार शैलीची भारतात झालेली सुरुवात म्हणता येईल.

सम्राट अशोकाच्या काळात लेखनाची सुरवात झाल्याचे पुरावे आपणास मिळतात. हे लेख पाषाणावर कोरल्या जायचे. पण या काळात पाषाण मुर्तीच्या निर्मीतेचा पुरावा आढळत नाही. गांधार शैलीतील जे शिलालेख आहेत त्यांची कालमर्यादा इ.स.103 सालापासून ते इ.स. 384 पर्यंतची आहे. एकंदर शिल्पविकासाचा काळ हा इसवी सणाच्या पहिल्या पाच शतकांचा आहे.

भारतात लोह युगाची सुरुवात ही इसवी सन पूर्व 1600 ते इसवी सन पूर्व 1000 या काळात मानली जाते. भारतीय मूर्ती कलेचा इतिहास हा आपणास हडप्पा व मोहंजोदाडो येथे इसवी सन पूर्व 7500 च्या काळात घेऊन जातो. यामध्ये आपणास अनेक मृंणमूर्ती , खेळणी, एका नर्तिकेची मूर्ती, एका दाढीवाल्या पुरुषाची मूर्ती आढळलेली दिसते. ही शिल्पे या काळातील उत्कृष्ट मूर्ती कलेचे उदाहरण मानता येतात. हडप्पा येथून पाषाणच्या 2 तर मोहंजोदाडो येथून 11 लघु पाषाण मुर्त्या प्राप्त झालेल्या आहेत. पुरातात्विक साक्ष यांच्या आधारे हडप्पा पेक्षाही मोहंजोदाडो येथील मूर्तीकला प्राचीन मानली जाते.

प्रारंभिक बुध्द शिल्प कलेच्या इतिहासात बुध्द शिल्प अज्ञात आहेत. कारण तथागत भगवान बुध्द स्वत: आपल्या मूर्ती पूजेच्या विरोधात होते. इसवी सन पूर्व 484 बुध्दांच्या

महापरिनिर्वाणानंतर त्यांची मूर्ती निर्माणाची कोणतीही परंपरा स्थापित झाली नाही. बुध्दांच्या महापरिनिर्वाणानंतर पाचशे वर्षांनी त्यांची शिल्प बनायला सुरुवात झाली.

तत्पूर्वी बुध्दांच्या शारीरिक व पारभोगीक धातूंवर स्तूप उभारुन त्यांची पूजा केली जायची. साधारणत: बुध्द मूर्ती कलेचा उदभव हा कुषान राजांच्या काळातील मानला जातो. कुषान काळामध्ये गांधार व मथुरा हया शिल्पकला शैलीचा उगम झाला. गांधार कलेने प्रभावित असलेली सर्वप्रथम बुध्द मुर्ती इ.स.128 मधील आहे तद्नंतर शैलीचा स्वतंत्र विकास झाल्याचे पुरावे आपणास मिळतात.

नंतरच्या कालखंडात सातवाहन सत्तेचा उदय झाला त्यांनी इ.स.पूर्व 200 ते इसवी सनाच्या 225 पर्यंत जवळपास चारशे वर्षे राज्य केले. सातवाहन कालखंडामध्ये मूर्तिकलेचा सर्वाधिक विकास झाला. पश्चिम भारत, दक्षिण पूर्वी क्षेत्र व तसेच समुद्री व नदी मार्गाव्दारे होणार या व्यापारावर सातवाहनांचे नियंत्रण होते. यामुळे सातवाहनांच्या काळामध्ये समृध्दी व भरभराटीचे झाली. याचा परिणाम असा झाला की सातवाहनांच्या काळामध्ये अनेक बुध्द लेण्या कोरल्या गेल्या व अनेक राजा , मंत्री , व्यापारी , सर्वसाधारण लोक यांनी शिल्पे व लेणी कोरण्यासाठी अनेक दान दिल्याचे पुरावे आपणास आढळतात. प्रामुख्याने या काळामध्ये सांची, पितळखोरा, बेडसे, कोंढाणे, अजंठा, वेरुळ, अमरावती अशा अनेक लेण्या व तेथील शिल्पे निर्माण झाली. पितळखोरा येथील लेणी संख्या 10,11, व 13 हया इसवी सन पूर्व पहिल्या शतकातील मानल्या जातात. त्यानंतर कारला, नाशिक, जुन्नर येथील लेण्या कोरल्या गेल्या. कान्हेरी येथे दुसऱ्या शतकातील लेण्या सुध्दा आढळतात. यानंतर सहाशे ते सातशे वर्षे हे काम अविरतपणे चालू राहील.

प्रकरण - पाचवे

बुध्द शिल्प व कवि अष्वघोशांचे साहित्य

भारतीय लेखन कला ही इसवी सन पूर्व 3 रे शतक म्हणजे सम्राट अशोकाच्या काळात निर्माण झाली. कारण त्या पूर्वी लेखनाचे पुरावे आढळत नाही. प्राचीन काळी साहित्य हे ताडपत्र, चर्मपत्र, ताम्रपत्र यावर लिहिल्या जायचे. तर शिल्पकला हि इसवी सणाच्या पहिल्या शतकापासून उदयास आल्याचे दिसते. यावरुन अगोदर साहित्य निर्माण झ ाले असे आपणास म्हणता येते.

. कवि अष्वघोश्यानी बुध्दांच्या जीवनावर आधारित 'बुध्दचरीत, सौन्दरानंद या सारखी महाकाव्ये लिहिली ती बुध्द शिल्प निर्माण होण्या अगोदरच सहाजिकच त्यांच्या बुध्द साहित्याचा प्रभाव हा बुध्द शिल्पकलेवर झालेला आढळून येतो. केवळ अष्वघोश्यांच्याच साहित्याचा संपूर्ण प्रभाव हा बुध्द शिल्पावर झाला असे आपणास म्हणता येणार नाही. या बरोबरच जातक कथा, थेरगाथा, थेरीगाथा, अश्या अनेक साहित्याचा प्रभाव निश्चितच असणार आहे. परंतु कवि अष्वघोशांसारख्या महाकवींच्या साहित्याचा सुध्दा प्रभाव आहे हे आपण त्यांचे साहित्य अभ्यासल्यानंतर हे सिध्द करु शकतो . कवी अश्वघोशाबद्दल चिनी प्रवासी फाहीयान, इत्सिंग सुध्दा त्यांच्या विव्दतेची प्रशंसा करतात. या वरुन साहित्याचे महत्व लक्षात येते.

बुध्द शिल्प व कवी अष्वघोष यांचे साहित्य :

महाकवी अष्वघोष यांनी लिहिलेल्या बुध्दचरित मधील एकूण 28 भागांपैकी तेरा महत्वपुर्ण भाग आहत त्या सर्व भागासंबंधित शिल्पे आपणासे अनेक लेण्यामध्ये आढळतात.

उदा. 1 भगवतप्रसूती (सर्ग/भाग पहिला) या मध्ये एक श्लोक आहे -

1) दीपप्रभोऽयं कनकोज्जवलाड, सुलक्षणैर्यस्तु समन्वितोऽस्ति। निधिर्गुणानां समये स मन्ता बुध्दर्षिभाव परमां वा ॥-- बु.च. 1/34) ।

चक्राङ्कपाद स ततो महर्षिर्जालावनध्दानुलिपाणिपादम् ।

सोर्णभ्रुव वारणवस्तिकोश सविस्म्यं राजसुत ददर्श ॥ (बुध्दचरित 1/60)

अर्थ : हे राजा तुझा पुत्र 28 शुभ लक्षणांनी अलंकृत आहे. आपल्या शुभ गुणांनी तो सव्र प्राणीमात्रांना प्रिय होईल. बालकाच्या पायांवर हातांवर शुभचिन्ह व रेखा आहेत. त्याच्या भुवया केस युक्त असून त्याचे अंडकोष हत्तीसारखे सूक्ष्म आहेत. ही सर्व लक्षणे देवतांची आहेत. हा धर्माचा राजा होईल बुध्दत्व प्राप्त करुन मोह पाशात अडकलेल्या जगाला दु:खात मुक्त करेल. अशा प्रकारे महर्षी असीत मुनी यांनी भविष्यवाणी करुन आकाशमार्गे जसे आले त्याच प्रमाणे मार्गस्थ झाले.

2) यथा हिरण्यं शुचि धातुमध्ये मेरुगिरीणां सरस समुद्र : ।

तारासु चन्द्रस्तपतां च सूर्य: पुत्रस्था ते व्दिपदेषु वर्थ: ॥ (बुध्दचरित 1/37)

अर्थ - ज्याप्रमाणे धातूमध्ये सुवर्ण, पर्वतामध्ये सुमेरु पर्वत, जलाशयांमध्ये समुद्र ताऱ्यामध्ये चंद्र, अग्नी मध्ये सुर्य श्रेष्ठ आहे त्याचप्रमाणे मनुष्यमात्र मध्ये बुध्द सर्वात श्रेष्ठ आहेत.

2) प्रागर्भधानान्मुनुज्ञेद्रपती सित दर्दश दिपराजमेक ।

स्वप्ने विशंत वपु रत्मन: सा ।

अर्थ : गर्भधारण करण्यापुर्वी महामाया स्वप्नामध्ये एक पांढरा शुभ्र गजराज तिच्या कुशीमध्ये शिरतो परंतु यामुळे महा मायाला कोणत्याही प्रकारचे कष्ट होत नाहीत.

3) दीवौकरस्स: खे यस्स प्रभावातप्रणतै: शिरोभि ।

आधारयन पांडरमतपत्त बोधाय जेपु: परमा शिपष्य

अर्थ : भगवान बुध्दांच्या तेजामुळे अदृश्य देवतांनी आपले शीर झुकुन श्वेत वस्त्र परिधान करुन त्यांच्य बुध्दत्व प्राप्तीसाठी उत्तम आशीर्वाद दिले.

4) वयश्र्च कौमारमतीत्य सम्यक् सम्प्राप्य काले प्रतिपत्तिकर्म ।

अल्पैरहोभिर्बहुवर्षगम्या जग्राह विद्या: स्वकुलानुरुपा: ॥ (बुध्दचरितम् 2/24)

अर्थ : सिध्दार्थ गौतमाने वयात आल्यानंतर त्यांचा विवाह अत्यंत रुपवान, विद्यासंपन्न उच्च कुलोत्पन्न अशा यशोधरेशी झाला.

वरील श्र्लोकांमध्ये उल्लेखित प्रसंग उदा. सिध्दार्थ गौतमाचा महामायेच्या पोटी झ ाालेला जन्म याचे शिल्प अजंठा-वेरुळ, साची भारताहून अमरावती अशा सर्वच ठिकाणी आपणास बघायला मिळते. त्याचप्रमाणे बुध्दांना बुध्दत्व प्राप्त झाल्यानंतर आकाशातून देवतागण त्यांच्यावर पुष्पवृष्टी करत आहेत अशा प्रकारचे शिल्प आपणास अजंठा पितळखोरा सांची या ठिकाणी आढळते. अशाच प्रकारे कवी अश्वघोष यांनी आपल्या बुध्दाचारिता मध्ये उल्लेख केलेल्या अनेक श्र्लोकांच्या आधारे शिल्प निर्माण झाल्याचे आपणास सांगता येते. कारण चीनी यात्री फाहयान व इत्सिंग यांनी कमी अश्वघोष यांच्या बुध्दचरित बद्दल लिखाण केलेले आहे. त्यांच्या मते कवी अश्वघोष यांच्या बुध्दचरित यांचे पठण हे संपुर्ण भारतामध्ये दररोज केले जात होते. ते इतके प्रिय झाले की, त्याचा चीनी अनुवाद केला गेला. व आज आपणास कवी अश्वघोष यांचे बुध्दचरित्र हे चिनी भाषे मधूनच आपणास प्राप्त झालेले आहे. एवढी लोकप्रियता बुध्दचरित्र याची भारत.तिबेट,बम्हदेश,चीन,जपान या सर्व देशामध्ये होती.

यामुळे जनमानस, भिख्खुसंघ व विव्दानांमध्ये बुध्दचरिताचे असलेले महत्व, प्रभाव आपणास दिसून येते. कालांतराने बुध्द शिल्प निर्माणाच्या वेळी शिल्पकारांनी कवी अश्वघोष यांच्या याच बुध्दाचारिता चा अनेक ठिकाणी शिल्प निर्माणासाठी आधार घेतल्याचे निदर्शनास येते.

निष्कर्ष

संशोधक स्वाक्षरी

मार्गदर्शक स्वा|क्षरी